बुधवार, १० डिसेंबर २०१४ प्रहार

# वक्तृत्व स्पर्धेत मीना कुडचिरकरचे सुयश

▶दोडामार्ग (प्रतिनिधी)

येथील लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयात प्रथमच आयोजित केलेल्या फोरम ऑफ फ्री एंटरप्राइज, मुंबई पुरस्कृत ए. डी. श्रॉफ स्मृती वक्तृत्व स्पर्धेत कु. मीना कुडचिरकर प्रथम आली. २५ विदयार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता.

यात व्दितीय क्रमांक सागर गवस तर तृतीय क्रमांक भाग्यश्री गवस हिने मिळवला. उत्तेजनार्थ कु. पौर्णिमा वराडकर व कु. पल्लवी पर्टे यांना गौरविण्यात आले. पहिल्या तीन क्रमांकांना रोख पारितोषिकेव प्रशस्तीपत्र तर उत्तेजनार्थ दोन विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रे देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयातील युवकांमध्ये आर्थिक विषयावर जागृती व चिंतन व्हावे या उद्देशाने मुंबईतील फोरम ऑफ फ्री एंटरप्राईज या संस्थेने गेली ५० वर्षे सातत्याने ए. डी. श्रॉफ मेमोरियल इलोक्युशन कॉंपिटिशन या नावाने या स्पर्धा आयोजित केल्या असून या स्पर्धेत हळबे महाविदयालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावर्षी स्पर्धेसाठी लोकशाहीमध्ये युवकांची भूमिका, जलसंधारणाचे अर्थशास्त्र, नागरिकांसमोरील आव्हाने, लहान राज्य निर्मितीचे आर्थिक धोरण आणि थेट परकीय गुंतवणूक हे विषय निश्चित केले होते.



मीना कुडचिरकर



सागर गवस



भाग्यश्री गवस

साखळी पध्दतीने आयोजित केलेल्या या स्पर्धेत प्राथमिक फेरीत इंग्रजी, हिंदी व मराठी भाषांतून २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

त्यातून ९ विद्यार्थ्यांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. सौ. हुनुसवाडकर, प्रा. डी. वाय बर्वे, प्रा. एम. टी. बेग यांनी काम पाहिले.